# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/11/2022 (मंगळवार) सायंकाळ


---

## शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कन्हान** :– दिनांक २१/०४/२०१० चे १८.२० वा. दरम्यान फिर्यादी नामे–चुडामन नत्थुजी अंबागडे, वय ४५ वर्ष, रा. तिलकवाड रामटेक यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कन्हान येथे अप. क्र. ६१/२०१० कलम ३५३, ३३२, ३२४, २९४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २१/०४/२०१० चे १३.४५ वा. सदर गुन्हयातील फिर्यादी हा शासकीय कर्मचारी असुन एम. एस. ई. बी. चे इलेक्ट्रीक मिटर लावण्याचे शासकीय काम करीत असता आरोपी प्रविण चंद्रभान सेलारे, वय ३२ वर्ष, रा. पिपरी कन्हान याने म्हटले की, आमचे गावातील स्ट्रीट लाईटचे काम केले नाही. असे बोलुन फिर्यादीला हातबुक्क्याने मारपीट करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. अशा फिर्यादीच्या तोंडी रीपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस हवालदार ब. नं. ७०५ श्री. राजेंद्र खरबड, पोस्टे कन्हान यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक २२/११/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. डी. बी. कदम यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५३ भादंवि मध्ये ०६ महिने सश्रम कारावास आणि ५ हजार रू. दंड, दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद तसेच कलम ५०४ भादंवि मध्ये ०३ महिने सश्रम कारावास व ५ हजार रू. दंड, दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. गौरकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस पोलीस शिपाई ब. नं. १४६८ सैफुल्लाह अहमद पोलीस स्टेशन कन्हान यांनी मदत केली आहे.

# अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. भिवापुर :–** अंतर्गत १७ कि.मी. अंतरावरील मौजा धामनगाव शिवार येथे दिनांक ११/११/२०२२ चे ०३.३० वा. ०४.०० वा. दरम्यान यातील मृतक नामे– राजेश्वर सोमा भेंडे, वय ३२ वर्ष, रा. धामनगाव ता. भिवापुर हा नमुद घटना वेळी व ठिकाणी स्वत:चे शेतात मिर्चीचे थिमेंट मिश्रण करून फवारणी करीत असता त्याचे नाका तोंडात विषारी औषध गेल्याने त्याची प्रकृती अचानक खराब झाल्याने त्याला पुढील उपचाराकरीता मेडीकल कॉलेज, नागपूर येथे दि. ११/११/२०२२ रोजी भरती केल्याने उपचारादरम्यान डॉक्रांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी पो.स्टे. भिवापुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार भगवानदास यादव पोस्टे भिवापुर मो.क्र. ९४२२११५५९१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**